# 15 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"संधी शिवाय कार्यक्षमतेला किंमत नाही."

## आजचे पंचांग :

वार – बुधवार
दिनांक : 14 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – भरणी
सुर्योदय – सकाळी 7.06 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 02 वाजता

## आजचे दिनविशेष :

- जागतिक **चहा** दिवस.
- 1953 ला भारताच्या एस विजयलक्ष्मी पंडित ह्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या होत्या.
- 1997 ला भारताच्या लेखिका अरुंधती रॉय यांना "द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज" या पुस्तकासाठी बुकर पुरस्काराने सन्मानित.
- 1976 ला भारताचे प्रसिद्ध फुटबॉल खेळाडू बाईचुंग भूटिया यांचा जन्म.
- 1988 ला भारताची प्रसिद्ध कुश्तीपटू गीता फोगाट यांचा जन्म.
- 1950 ला भारताला स्वतंत्र मिळवून देण्यात मोठा हात असणारे **सरदार वल्लभभाई पटेल** यांचे निधन.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) On – वर    2) In - आत    3) Below – खाली    4) Up – वर

## आजची प्रश्नमंजुषा :

1) तुमच्या वर्गात किती मुले व किती मुली आहेत?
2) चार वर्तुळाकार वस्तूंची नावे सांगा.
3) 20 वह्या 5 मुलांमध्ये वाटल्यास प्रत्येकाला किती मिळतील?
4) काटकोन किती अंशाचा असतो?

## बोधकथा :

### मूर्खांचे निष्कर्ष

एका खगोलशास्त्रज्ञाने दुर्बिणीतून सूर्याचे निरीक्षण केले. त्याला निरीक्षणातून असे कळून आले की सूर्यावर प्रचंड मोठा प्राणी आहे व आपण खूप मोठा शोध लावला या समजूतीने तो लोकांना जमवून त्या शोधाची माहिती सांगू लागला की " सूर्य प्रचंड उष्ण तारा असूनही त्यावर एक प्राणी जीवंत राहतो आणि तुम्ही सगळे आता घाबरून राहा जर तो प्राणी पृथ्वीवर आला तर पृथ्वीचे काय होईल हे पहा." खगोलशास्त्रज्ञाच्या या बोलण्यावर काही लोकांचा खरेच विश्वास बसला व त्यांच्यापैकी काही लोकांनी त्याचा सत्कार करण्याचे ठरविले.
पण जमलेल्या काही लोकांपैकी एक जण चिकित्सक होता त्याने त्या ज्योतिष्याची दुर्बिण तपासायचे ठरविले व त्याने ती दुर्बिण तपासली असता त्याच्या लक्षात आले की महाकाय प्राणी हा सूर्यावर नसून एक माशी दुर्बिणीच्या काचेवर अडकून पडली आहे आणि सूर्याकडे पाहताना ती माशी म्हणजे महाकाय प्राणी असल्याचा भास होत होता. चिकित्सक माणसाने ही गोष्ट लोकांना सांगताच त्यांना शास्त्रज्ञाचा मूर्खपणा लक्षात आला.
तात्पर्य: जे लोक मूर्खपणाने किंवा उतावीळपणे बेछूट विधाने करतात किंवा सारासार विचार न करता, पुढचामागचा विचार न करता बोलत राहतात असे लोक कधी ना कधी तोंडावर आपटतात. त्यांचा पराभव हा निश्चित ठरलेला असतो.